**संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहिरात**

# महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१९
# पोलीस आयुक्त ठाणे शहर

जाहिरात क्रमांक-०१ ठिकाण-ठाणे दिनांक

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक १८.०१.२०१९ च्या आदेशान्वये केलेल्या सुधारणांनुसार **पोलीस आयुक्त ठाणे शहर** यांच्या आस्थापनेवर सन २०१९ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी **१००** पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

## १) पोलीस शिपाई :-

| | अ.जा. | अ.ज. | वि.जा.-अ | भ.ज.-ब | भ.ज.-क | भ.ज.-ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एस.ई.बी.सी | इ.डब्ल्यु.एस. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | २१ | ०० | १५ | ०३ | ०० | ०० | ०० | ०० | १३ | १० | ३८ | १०० |
| कप्पीकृत आरक्षण ⬇ | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०७ | ०० | ०४ | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०३ | ०१ | ११ | २८ |
| महिला | ०६ | ०० | ०५ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०४ | ०३ | ११ | ३० |
| खेळाडू | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ | ०६ |
| प्रकल्पग्रस्त | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ | ०६ |
| भूकंपग्रस्त | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| माजी सैनिक | ०३ | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०२ | ०६ | १५ |
| अंशकालीन पदवीधर | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ | ०६ |
| पोलीस पाल्य | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |
| गृहरक्षक दल | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ | ०६ |
| अनाथ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| **एकूण** | २१ | ०० | १५ | ०३ | ०० | ०० | ०० | ०० | १३ | १० | ३८ | १०० |

अ) उपरोक्त पदे ही दिनांक ३१/१२/२०१९ अखेर पर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावली नुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

ब) अंतिम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची

Scanned by CamScanner

निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

क) पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे दर्शविलेली पदे व आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे नियुक्ती प्राधिकाऱ्यास राहतील. त्याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

ड) या कार्यालयाच्या आस्थापनेवर बॅन्ड पथकामध्ये भरतीसाठी पदे उपलब्ध नाहीत.

२) महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई पदासाठी पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम-२०११ वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह, (शा.नि.क्र.जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र.३०२/तुरुंग-१, दि.१५/०१/२०१६ अन्वये) लागू आहेत. सर्व सेवाप्रवेश नियम सुधारणांसह www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर (Home Page) वर व www.thanepolice.gov.in वर उपलब्ध असून ते त्या त्या पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागू राहतील.

**महत्त्वाची टीप :-**

पोलीस शिपाई भरती करणेबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधीत उमेदवाराने त्याबाबतची माहिती ॲण्टीकरप्शन ब्युरो, ठाणे यांना दुरध्वनी क्रमांक ०२२-२५४२७९७९ / २५४३१३८८ वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस आयुक्त, ठाणे शहर कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती-२०१९ तथा अपर पोलीस आयुक्त (प्रशासन) यांच्याशी संपर्क साधून तक्रार करु शकतील. तसेच, अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयात ०२२-२२०२३६३७ या दुरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल.

उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | दुरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १. | पोलीस आयुक्त, ठाणे शहर कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत) | ०२२-२५३८२५६६ |

(संजय येनपुरे)
**अपर पोलीस आयुक्त (प्रशासन)**
**पोलीस आयुक्त ठाणे शहर करीता**

Scanned by CamScanner